दै.बीड

# सुपरफास्ट

www.beedsuperfast.com

• संपादक : अतुल शंकरराव जाधव •

• beedsuperfastgmail.com •

■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ ■ अंक २३४ ■ सोमवार दि. ३१ ऑगस्ट, २०२६ ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ पाने ४ ■ किंमत ४ रु.

■ BEED (Maharashtra) ■ Year-4 ■ Issue-234 ■ Monday 31 August, 2026 ■ RNI : MAHMAR/2023/84694 ■ Pages 4 ■ Price 4


## १८ हजारांहून अधिक लाभार्थ्यांची रेशन कार्ड होणार रद्द

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये १८ हजारपेक्षा जास्त अपात्र लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात येणार आहेत. नोकरी असूनही किंवा वार्षिक उत्पन्न अधिक असतानाही मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्यांवर ही कारवाई होणार आहे. पुरवठा विभागामार्फत मिशन सुधार या मोहिमेअंतर्गत रेशनकार्डची कसून तपासणी सुरू आहे. या मोहिमेदरम्यान, दहा निकषांच्या आधारावर शिधापत्रिकांची पडताळणी केली जात आहे. यामध्ये ८६२ शिधापत्रिका धारकांचे वार्षिक उत्पन्न अधिक असल्याचे आढळून आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, शासकीय सेवेत असलेले तब्बल १६ हजार ६९३ लोक रेशन दुकानातून मोफत धान्य घेत असल्याचे समोर आले आहे. या सर्व अपात्र लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वास्तविक पात्र लाभार्थ्यांनाच धान्याचा लाभ मिळावा, यासाठी पुरवठा विभाग ही विशेष मोहीम राबवत आहे. या कारवाईमुळे शासकीय योजनेचा गैरवापर रोखण्यास मदत होणार आहे.

# मनोज जरांगे चुकीचं मागत नाहीत, मुलांसाठी शिक्षणाचा आणि रोजगाराचा अधिकार मागतायेत, अभिजीत दिपकेंचा पाठिंबा

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन राज्यातील वातावरण पुन्हा एकदा तापलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कालपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय मागे हटणार नाही, असी भूमिका त्यांनी घेतलीय. दरम्यान, त्यांच्या या आंदोलनासंदर्भात कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जर सरकारने समाजाच्या मुलांना चांगलं शिक्षण दिलं असतं आणि रोजगाराचे संधी दिली असती तर मनोज जरांगे सरांना आंदोलन करावं लागलं असतं का? असा सवाल दिपकेंनी उपस्थित केला. हे कुठून कुठे सरकारचा अपयश आहे, आज राज्यात सगळेजण आंदोलन करत आहेत असे दिपके म्हणाले. मराठा समाजाच्या मुलांना शिक्षण चांगलं मिळत नाही, रोजगाराची संधी त्यांना मिळत नाहीत असे दिपके म्हणाले. मी मनोज जरांगे सरांना भेटणार असल्याचेही दिपके म्हणाले. मनोज जरांगे सर यांना आंदोलन करण्याची आज वेळ का आली? जेव्हा एखादा व्यक्ती आंदोलन करतो तेव्हा त्याच्या समोरचं ते लास्ट ऑप्शन असतं तिथं सरकार त्यांना मजबूर करते. जर सरकारने समाजाच्या मुलाला चांगलं शिक्षण दिलं असतं आणि रोजगाराचे संधी दिली असती तर मनोज जरांगे सरांना आंदोलन करावा लागला असता का? असा सवाल दिपकेंनी केला. हे कुठून कुठे सरकारचं अपयश आहे, आज राज्यात सगळेजण आंदोलन करत आहेत. मराठा समाजाच्या मुलाचे शिक्षण चांगलं झालं नाही रोजगाराची संधी त्यांना सुद्धा मिळत नाही. हे सरकारचं अपयश आहे की त्यांना आंदोलन करावं लागत आहे. आम्हाला तरी कुठं आवडतं होतं. आम्हाला जंतर-मंतरवर जसं ३५ दिवस सरकारने बसून ठेवलं होतं. सरकारला माझी विनंती आहे की ३१ दिवसानंतर तुम्ही आमच्या सोबत डायलॉग करायला आले, मनोज जरांगे सरांसोबत तुम्ही असं करु नका, त्यांच्यासोबत बसा चर्चा करा आणि काही नाही काही तोडगा काढा असे दिपके म्हणाले. मनोज जरांगे पाटील काही चुकीचं मागत नाहीत, मराठा समाजाच्या मुलांसाठी शिक्षणाचा अधिकार मागत आहेत असे दिपके म्हणाले. रोजगाराचा अधिकार मागत आहेत. याची गरज यासाठी पडली आहे की सरकार त्या दोन गोष्टीवर पूर्णपणे अपेक्षित आहे. मी जरांगे पाटील यांनी नक्की भेटणार आहे. ते दिल्लीपर्यंत आले होते, मी इथपर्यंत जाऊ शकतो. मनोज जरांगे सरांना भेटायला मी नक्की जाईल असेही दिपके म्हणाले.





## ॲड.शेख शफीकभाऊ यांना मातृशोक

**बीड । प्रतिनिधी**

एमआयएम पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीकभाऊ यांच्या आईंचे रविवारी (दि.३०) सायंकाळी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७६ वर्ष होते. रात्री उशिरा त्यांच्या पार्थिवावर तकीया मस्जिद कब्रस्तानात दफनविधी करण्यात आला.

मागील काही दिवसांपासून त्या आजारी असल्याने त्यांच्यावर शहरातील खाजगी दवाखान्यात उपचार सुरू होते. या उपचारादरम्यान त्यांची रविवारी (दि.३०) सायंकाळी प्राणज्योत मालवली आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शेख कुटुंबावर कोसळलेल्या या दु:खात दैनिक बीड सुपरफास्ट परिवार सहभागी आहे.

## दोन दशकांचा भावातील बांधाचा वाद मिटला



### सिरसाळा पोलिसांनी बांधावर जाऊन केली मध्यस्थी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस दलाचा पोलीस बांधावर उपक्रमांतर्गत सिरसाळा पोलिसांनी ठाणे हद्दीतील काळ्याचीवाडी येथील दोन भावांमध्ये मागील जवळपास दोन दशकांपासून बांधाचा वाद होता. याची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी थेट बांधावर जाऊन दोन्ही भावांमध्ये मध्यस्थी केली आणि त्यांचा वाद सामोपचाराने मिटवला आहे. यामुळे दोन कुटुंबातील वैर संपले असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. शेतीच्या बांधावरून निर्माण होणारे वाद, त्यातून » पान २ वर

## माझ्या जडणघडणीत भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा सिंहाचा वाटा : नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा



### अमृत दौडला मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने विद्यार्थ्यांवर केवळ शैक्षणिक संस्कार केले नाहीत, तर विविध क्षेत्रांत कर्तृत्ववान अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते आणि शिक्षणतज्ज्ञ घडविले आहेत. माझ्या कारकिर्दीतील आणि जडणघडणीतील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा सिंहाचा वाटा असून, या संस्थेचे ऋण मी कायम मनात जपतो, असे प्रतिपादन अंबाजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित अमृत दौडच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर भाजपा नेते अक्षय मुंदडा, खोलेश्वर संकुलाचे अध्यक्ष डॉ.अतुलदादा देशपांडे, कार्यवाह किरणदादा कोदरकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा महाविद्यालय समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी, डॉ.सौ.कल्पनाताई चौसाळकर, विष्णू सोनवणे, नितीन चौधरी, सीबीसी स्कूलचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव चौसाळकर, माध्यमिक विभागाचे अध्यक्ष अविनाश मुडेगावकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक फुलारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंत राम कोपले आदी उपस्थित होते. नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी आरोग्यासाठी धावणे आणि नियमित व्यायाम करणे ही काळाची गरज आहे. खोलेश्वर संकुलाने अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने अमृत दौडचे आयोजन करून आरोग्य विषयक सकारात्मक » पान २ वर

**क्षणचित्रे :** अमृत दौड मध्ये महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. तर वयस्कर महिलांनी ही दाखवला उत्साह, ड्रेसकोड मध्ये स्पर्धकांची शिस्तबद्ध उपस्थिती होती. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संत भगवान बाबा चौकापर्यंत अमृत दौडीने मार्ग फुलून गेला होता.

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सैनिक स्कूलमध्ये पारितोषिक वितरण

## शिक्षक व विद्यार्थ्यांची रस्सीखेच स्पर्धा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शनिवारी योगेश्वरी सैनिक स्कूलमध्ये विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण झाले. हेच औचित्य साधून स्कूलमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या रस्सीखेच स्पर्धा चांगलीच रंगली होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य मेजर एस. पी.कुलकर्णी हे होते. स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील क्रिडा विभागप्रमुख डॉ. प्रवीण भोसले, फोक अख्यान अभिनेत्री ऋचा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. उपप्राचार्य विवेकानंद कुलकर्णी व शाळेतील क्रीडा विभागप्रमुख डॉ. राहुल माने यांची ची व्यासपीठावर उपस्थिती होती. मेजर ध्यानचंद यांनी हॉकी क्रीडा प्रकारात देशाला सुवर्णपदके मिळवून दिली. त्यामुळे देशाचे नाव सर्वत्र झाले. त्यांच्या विविध आठवणी सांगून




सैनिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भावी काळात देशाचा असाच नावलौकिक जगभर वाढवावा असे आवाहन डॉ. प्रवीण भोसले यांनी केले. ऋचा कुलकर्णीने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांच्याकडून गीत म्हणून घेतले. प्राचार्य एस.पी. कुलकर्णी यांनी विविध स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे कौतुक करून भावी काळात सर्व स्पर्धेत सहभाग वाढविण्याचे आवाहन केले.

## एलसीबीची आठ दिवसात गुटख्यावर तिसरी कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारने तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्री व वाहतुकीवर बंदी घातलेली असतानाही बीड शहरासह जिल्ह्यात गुटख्याची खुलेआम वाहतूक व विक्री सुरू असल्याचे चित्र आहे. अशाच प्रकारे प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करणाऱ्या एकाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले.त्याच्याकडून तब्बल १ लाख ४ हजार रुपये किमतीचा विविध कंपन्यांचा गुटखा जप्त करण्यात आला.



स्थानिक गुन्हे शाखा पथकाने मागील आठवड्यातच पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत खांडे पारगाव शिवारात गुटखा साठ्यावर कारवाई करून जवळपास आठ लाखाचा गुटखा जप्त करण्यात आला होता. यामुळे स्थानिक पोलीसांचा गुटखा माफीयांना छुपा पाठिंबा आहे का? असा देखील सवाल उपस्थित होत आहे.दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे १०.१५ वाजता बीड बसस्थानक ते बार्शी नाक्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील शिवराज पान सेंटर चौकात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. वडवणी कडे जाणाऱ्या रिक्षामध्ये राहुल ऊर्फ राहत सतीश वावधने (वय ३२, रा. सिंधफणा शाळेसमोर, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड) हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विविध कंपन्यांचा गुटखा आर्थिक फायद्यासाठी चोरट्या पद्धतीने विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून त्याची वाहतूक करताना आढळून आला.पोलिसांनी त्याच्याकडील प्रतिबंधित गुटखा जप्त करून » पान २ वर

## राशन घेण्यावरुन वाद; पिता,पुत्राला मारहाण

**तिघांविरुद्ध बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राशन घेण्याच्या कारणावरुन वाद झाल्यानंतर तिघांनी मिळून पिता, पुत्राला दगडाने आणि लाथा बुक्यांनी तसेच चावा घेऊन जखमी केल्याची घटना धसवाडी (ता. अंबाजोगाई) येथे काल शनिवारी सकाळी १०:४० वाजता घडली आहे. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये एका महिलेचा समावेश आहे. धसवाडी (ता.अंबाजोगाई) येथे राशन दुकानासमोर राशन घेण्यासाठी रांग लागली होती. यावेळी राशन घेण्याच्या कारणावरून किरकोळ वाद झाला.

लिंबाजी सोनहिवरे यांनी आधी राशन घ्या पुन्हा भांडण करा मला काम असल्याचे सांगितले याचा राग आल्याने आरोपींनी संगणमत करुन लिंबराज सोनहिवरे आणि मुलगा अंकुश सोनहिवरे यांना दगडाने आणि लाथा बुक्यांनी मारहाण केली. तसेच यातील » पान २ वर

## तीस दिवस पावसाचा खंड, खरीप पिकांनी टाकल्या माना

## शेतकऱ्यांचा मदतीसाठी आमदारांनी पुढे यावे -जे.डी.शाह

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्व मंडळ निहाय परीसरात पावसाने सलग सुमारे ३० दिवसाचा खंड दिल्याने बहरलेल्या खरीप पिकांनी आता माना टाकायला सुरवात केली आहे. भरमसाठ खर्च करुनही पावसाच्या या लहरीपणामुळे शेतकरी आता हवालदिल झाला आहे. मोठा आर्थिक फटका बसणार असल्याने सुकत असलेल्या खरीप पिकांचे विमा कंपन्यांनी तसेच शासकीय यंत्रणेकडून तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी, यासाठी जिल्ह्यातील सर्व आमदारांनी एकत्र येऊन मुख्यमंत्री यांची तातडीने भेट घेऊन वर्षे भराचे नियोजन ठरविले जाणारे पिके वाया जात असल्याने दिलासा देण्यासाठी आर्थिक मदत मिळुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे अल निनोच्या प्रभावामुळे यंदाचा मान्सून सुमारे एक महिना उशिराने सुरु झाला आहे. त्यामुळे खरीप हंगामही महिनाभराने उशिरा सुरु झालेला आहे. उशिरा सुरु झालेल्या खरीप हंगामी पिकांसाठी शेतकऱ्यांनी भरमसाठ खर्च केलेला आहे. त्यामुळे हंगाम उशिराने सुरु झालेला असला तरी खरीप हंगामी सोयाबीन, बाजरी, कपाशी, मका, तुर, भुईमुग ही पिके चांगली बहरलेली आहेत. मात्र गेल्या सुमारे तीस दिवसांपासून पावसाने पुन्हा उघडीप दिली आहे. समाधानकारक पाऊस पडला नसल्याने भूगर्भातील पाणी पातळीत कमालीची घट होवून विहीरींनी तळ गाठलेला आहे. » पान २ वर

# विमुक्त दिन विशेष.!

जगाच्या पाठिवर असा एकही कायदा नाही, की ज्या कायदयाने एखादी संपूर्ण जमातच गुन्हेगार ठरते तो कायदा ब्रिटिशांनी १२ऑक्टोबर १८७१साली भारतामध्ये आस्तित्वात आणला. ब्रिटिशांच्या विरोधात लढणाऱ्या १६८जमातींना गुन्हेगारी जमाती कायदे अंतर्गत क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट १८७१नुसार गुन्हेगार जमाती म्हणून घोषित करण्यात आल्या.ऐतिहासिक पार्श्वभूमी अशी होती की,ब्रिटिश सरकारने १८७१ मध्ये 'गुन्हेगार जमात कायदा' (Criminal Tribes act) लागू केला होता. या कायद्यामुळे अनेक भटक्या व विमुक्त जमातींवर जन्मतःच गुन्हेगार असल्याचा शिक्का बसला होता. विमुक्त जमातींना लावण्यात आलेल्या कायद्यामुळे या लोकांना जनावरासारखं तुरुंगात थांबण्यात येत असं. कुटुंबातील एका व्यक्तीने जरी गुन्हा केला तरी संपूर्ण कुटुंबच गुन्हेगार म्हणून तुंगत डांबत असत, यासाठी काही सेटलमेंट तयार करण्यात आल्या होत्या यामध्ये सोलापूर, गदग, हुबळी, धारवाड, खर्डा, पाबळ, विजापूर, अहमदाबाद, मद्रास इ. ५२ठिकाणी ब्रिटिशांनी सेटलमेंट तीन तारेचे कुंपण तयार केल्या होत्या.ब्रिटिश काळात देशभरातून एकूण १९८ जमातींना गुन्हेगारी जमाती म्हणून अधिसूचित (Notify) करण्यात आले होते. नंतरच्या काळात विविध राज्यांच्या भौगोलिक रचनेनुसार व शासकीय वर्गीकरणानुसार या याद्यांमध्ये बदल झाले.या गुन्हेगार जमाती मध्ये बेरड, बेस्तर, कंजारभाट, भामटा(टकारी, उचले, कामाटी, घंटीचोर, पाथरवट, पाथरकार, पात्रुड,गिरणी वड्डर ई), कैकाडी, कटबू, बंजारा, पालपारधी, राजपारधी, भामटा राजपूत, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद, मातंग इ. जमाती गुन्हेगार जमाती म्हणून घोषित करण्यात आल्या याची कारणे खालीलप्रमाणे आहेत. ब्रिटिशांनी १८७१ मध्ये 'गुन्हेगारी जमाती कायदा' (Criminal Tribes Act, 1871) लागू करून भारतातील अनेक भटके-विमुक्त समुदाय आणि आदिवासी जमातींना 'जन्मापासूनच गुन्हेगार' (Criminals by birth) घोषित केले होते. ब्रिटिशांनी हे पाऊल उचलण्यामागे खालील प्रमुख कारणे होती.

१)१८५७ च्या उठावातील सहभाग आणि बंडखोरीची भीती१८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक भटके, आदिवासी आणि वनवासी समुदायांनी (उदा. रामोशी,वडार, टकारी, कैकाडी,भिल्ल, धनगर, गुज्जर,पारधी, बंजारा, मातंग इ.) ब्रिटिशांविरुद्ध तीव्र लढा या जमातीनी दिला होता. या समुदायांमध्ये असलेली गनिमीकावा, चिवट झुंज,पराक्रमाची आणि स्वातंत्र्याची भावना ब्रिटिशांसाठी डोकेदुखी ठरली होती. त्यामुळे त्यांच्यातील बंडखोरीची भावना चिरडण्यासाठी ब्रिटिशांनी संपूर्ण जमातींवरच गुन्हेगारीचा शिक्का मारला. २)भटक्या जीवनशैलीबद्दल संशय ब्रिटिश अधिकारी एका ठिकाणी स्थिर राहून शेती करणाऱ्या लोकांना 'शांत आणि कायद्याचे पालन करणारे' मानत असत. याउलट, जे लोक किंवा व्यापारी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत स्थलांतर करत (भटके), त्यांच्याकडे ब्रिटिश नेहमी संशयाने पाहायचे. अशा फिरत्या लोकांवर पाळत ठेवणे आणि त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे ब्रिटिश पोलिसांना कठीण जात होते. ३) महसूल (Tax) गोळा करण्यात येणाऱ्या अडचणीब्रिटिशांचे मुख्य उद्दिष्ट भारतातून जास्तीत जास्त कर गोळा करणे हे होते. एका जागी स्थिर असलेल्या लोकसंख्येवर कर लावणे आणि तो वसूल करणे सोपे होते. परंतु, भटके कारागीर, व्यापारी आणि पशुपालक सतत जागा बदलत असल्यामुळे त्यांच्याकडून कर वसूल करता येत नव्हता. त्यांना एका ठिकाणी स्थिर राहण्यास भाग पाडण्यासाठी हा कायदा करण्यात आला. ४)स्वस्त मजुरांची गरज या कायद्याच्या नावाखाली ब्रिटिशांनी अनेक जमातींच्या जमिनी आणि जंगलांवरील हक्क हिसकावून घेतले. त्यानंतर या लोकांना विशेष छावण्यांमध्ये (Settlements) डांबून ठेवले गेले आणि रेल्वेचे काम, खाणी किंवा चहाच्या बागांमध्ये अतिशय कमी पैशात वेठबिगारी (Forced Labour) करायला लावली. ५)ब्रिटिशांचा वर्णद्वेषी आणि चुकीचा दृष्टिकोनत्या काळात ब्रिटिशांमध्ये 'व्हिक्टोरियन नैतिकता' आणि एक अजब वंशवादी विचारसरणी होती, ज्यानुसार एखाद्या गुन्हेगाराची मुले ही जन्मतःच गुन्हेगार प्रवृत्तीची असतात असे मानले जाई. याच चुकीच्या सिद्धांताचा आधार घेऊन त्यांनी भारतातील सुमारे १५० पेक्षा जास्त समुदायांना गुन्हेगार जमात कायदयाने बंदिस्त करण्यात आले. १५ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्य नंतरच्या काळात म्हणजेच ३१ गस्ट १९५२ पर्यंत या जमातीचे लोक सेटलमेंट मध्ये बंदिस्तच होते. परंतु काही जमाती या तुरुंगातच बंदिस्त आहेत हे भारतीय संसदेत भारतरत्न डॉ.बाबासाहेबांनी प्रश्न उपस्थित करून तात्कालिक पंतप्रधान पंडित जवाहर लाल नेहरू यांच्या लक्षात आणून दिले.त्यानंतर आमच्या टकारी समाजाचे भिष्मपितामह तथा सोलापूरचे माजी महापौर भिमरावजी(गुरुजी) जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने देशाचे पंतप्रधान पंडित जवाहर लाल नेहरू यांना आमंत्रित करून सोलापूर येथील तीन तारेचे कुंपण तोडून मुक्त करण्यात आले आहे असे सांगून या जमातीला मुक्त केले असं जाहीर केलं.३१ ऑगस्ट १९५२ रोजी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सोलापूर येथील जाहीर सभेत हा कलंक लावणारा कायदा रद्द झाल्याची घोषणा केली. यामुळेच विमुक्त दिन हा भटक्या -विमुक्त जाती जमाती या दिवसाला स्वातंत्र्य दिवस म्हणून साजरा करतात. भटक्या-विमुक्त जाती जमातीसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर पंडित जवाहरलाल नेहरू, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे, महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री वसंतराव नाईक, मा.मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक, लोकनेत्या नामदार पंकजाताई साहेब मुंडे, मा. खा. डॉ. प्रीतम ताई साहेब मुंडे, मा.मंत्री महादेवजी जानकर साहेब, आ. गोपीचंद पडळकर साहेब ई. जणांनी या जमातीच्या उत्थानासाठी काम केले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी प्रथमच जातीनिहाय जनगणना, ओबीसींसाठी केंद्रात वेगळ्या मंत्रालय स्थापन केले,भटक्या-विमुक्तांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, भटक्या -विमुक्तांसाठी पंतप्रधान आवास योजना, बार्टी,सारथी महाज्योतीप्रमाणेच अनार्टी संस्थेची घोषणा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या ना.पंकजाताई साहेब मुंडे यांनी आत्ताच्या अधिवेशनामध्ये भटक्या -विमुक्तांसाठी सबसिडी स्वरूपात वराह पालन योजना व शेड साठी गायरान जमीन देण्यात येणार आहे याबाबत अधिवेशनात अधिकृत घोषणा केली आहे.यामुळे या जमातीच्या युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. भटक्या विमुक्तांच्या अजूनही काही प्रलंबित मागण्या आहेत, यामध्ये कलम ३४० अन्वये केंद्र व राज्य सरकारने विविध आयोग, कमिट्या समित्या,उपसमित्या स्थापन केल्या परंतु त्यांच्या शिफारसी लागू करण्यात आलेले नाहीत. यामध्ये रेनके आयोग, अग्रवाल आयोग, न्यायमूर्ती बापट कमिशन, डॉ. अंत्रोळीकर समिती, थाडे समिती, लोकूर समिती, इदाते समिती, नच्चिपन समिती, इदाते आयोग इ. आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात याव्यात. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती प्रमाणेच भटक्या-विमुक्तांच्या जातीनिहाय जनगणनेसाठी वेगळा रकाना करण्यात यावा. पदोन्नतीतील आरक्षण पूर्ववत करण्यात यावे, भटक्या-विमुक्तांसाठी क्रीमिलर ची अट रद्द करण्यात यावी. बार्टी,सारथी प्रमाणेच महाज्योती व अनार्टी संस्थेला भरीव निधीची तरतूद करावी. टकारी समाजासाठी आर्थिक महामंडळाची घोषणा करावी. टकारी समाजाला इतर राज्याप्रमाणे अनुसूचित जमातीचे कायद्याच्यानुसार आरक्षण विषयी केंद्र व राज्य स्तरावर पाठपुरावा करावा. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय यादीमधील अ. क्र-३ वरील भामटा ऐवजी टकारी शब्द प्रयोग करणेबाबत राज्य सरकारकडे प्रकरण क्रमांक ३४/२००५ शिफारस पाठवण्यात आलेली आहे, याबाबत तात्काळ निर्णय राज्य सरकारने करणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्त जाती जमाती या राज्यात ११ टक्के आरक्षणाचा लाभ घेतात तर केंद्र सरकारच्या ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणात समाविष्ट आहेत ही विसंगती आहे. Criminal tribes means गुन्हेगारी जमाती, म्हणजेच अनुसूचित जमाती तर मग मागील काँग्रेस राज्य सरकारने असंवैधानिक Denotified - means DNT and NT- Notified tribes असा शब्दाचा घोळ घातला आहे. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी संपूर्ण भारतात विमुक्त दिन साजरा करण्यात येतो आहे. या मा.गुन्हेगारी जमातींना न्याय दयायचा असेल तर भारतीय राज्यघटनेने दिलेल्या आधिकारानुसार कलम ३४० अन्वये विविध आयोग,कमिट्या,समित्या यांच्या शिफारसी लागू करण्यात याव्यात अशी मागणी विमुक्त घुमंतू जनजाती विकास परिषद राज्य उपाध्यक्ष,भटक्या -विमुक्त जाती जमाती प्रदेशाध्यक्ष तथा भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी **बीड जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव केंद्र व राज्य सरकारकडे विमुक्त दीन निमित्ताने मागणी करत आहे.**



## पान १ आणि ४ वरुन...

### दोन दशकांचा भावातील...

होणारे भांडण आणि त्याचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या समस्या टाळण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन समजून घेण्याच्या उद्देशाने पोलीस आपल्या बांधावर हा नागरिककेंद्री उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शेतजमिनीच्या हद्दी, बांध, वाट, पाणी तसेच इतर शेतीविषयक कारणांवरून निर्माण होणारे वाद संवाद, समन्वय आणि कायदेशीर मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत सिरसाळा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे कावळ्याची वाडी येथे शेतीच्या बांधावरून दोन भावांमध्ये गेल्या तब्बल २० वर्षांपासून सुरु असलेल्या वादाची दखल घेण्यात आली. सदर प्रकरणी एनसी नंबर २४७/२०२६ व २४८/२०२६ अनुषंगाने पोलिसांनी घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. सदर वादाच्या ठिकाणी शेतीचा बांध नुकसानग्रस्त करण्यात आला असून बांधावरील दगड तक्रारदाराच्या शेतात टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर सिरसाळा पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन दोन्ही पक्षांशी संवाद साधला. दोन्ही भावांची बाजू समजून घेत वादाची पार्श्वभूमी जाणून घेतल्यानंतर परस्पर संवाद व समन्वयातून गेल्या २० वर्षांपासून सुरु असलेला शेतीच्या बांधाचा वाद यशस्वीरीत्या मिटविण्यात आला.

### माझ्या जडणघडणीत भारतीय...

संदेश दिला आहे. स्पर्धकांनी कोणत्याही परिस्थितीत न खचता मी पुढे जाणार हा आत्मविश्वास कायम ठेवावा. विशेष म्हणजे या स्पर्धेत सहभागी झालेला प्रत्येक स्पर्धक हा विजेताच आहे, असेही नगराध्यक्ष श्री.मुंदडा यांनी नमूद केले. अमृत दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद : प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे युवा नेते अक्षय मुंदडा, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर तसेच संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून अमृत दौडला सुरूवात करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संत भगवान बाबा चौक या मार्गावर झालेल्या या दौडीत मोठ्या संख्येने नागरिक, विद्यार्थी व महिला सहभागी झाल्या. संपूर्ण रस्ता अमृत दौडीने व्यापून गेला होता. संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, युवकांमध्ये ऊर्जा, उत्साह आणि आरोग्यविषयक जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने अमृत दौड आयोजित करण्यात आली. अंबाजोगाईचा शैक्षणिक आणि सामाजिक वारसा पुढे नेण्याचे काम भारतीय शिक्षण प्रसारक संस्था सातत्याने करीत आहे, असेही त्यांनी सांगितले. अमृत दौडचे विजेते पुढीलप्रमाणे आहेत. पुरूष गट १९ ते ३० वर्षे : प्रथम - नितीन बहिरवाळ, द्वितीय - दत्ता तिडके, तृतीय - बाबासाहेब धुनुक, तसेच पुरूष गट ३१ वर्षांवरील : प्रथम - संतोष लोहारे, द्वितीय - अक्षय साळवी, तृतीय - शंकर गाडगे, महिला गट १९ ते ३० वर्षे : प्रथम - दिव्या राठोड, द्वितीय - पूजा रणवीर, तृतीय - अश्विनी ढोणे आणि महिला गट ३१ वर्षांवरील : प्रथम - रमा रणवीर, द्वितीय - दिपाली खराडे, तृतीय - कविता रूपनर या सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र शेप यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सतीश बलुतकर यांनी मानले.

### गोरक्षनाथ टेकडी येथे...

माजी आ.बदामराव पंडित, ह.भ.प. अखंडानंद गिरी महाराज, गोपाळ महाराज शास्त्री, श्रीमती ज्योतीताई मेटे, जगदीश काळे, अरुण डाके, गंगाधर काळकुटे, राजेंद्र मस्के, कुंडलिक खांडे, परमेश्वर सातपुते, नितीन धांडे, किशोर पिंगळे, गंगाधर घुमरे, अरुण लांडे, हनुमंत देवकते, नारायण देवकते, ॲड.विष्णुपंत काळे, रोहिदास बायभट, अरुण बोंगाणे, ओम प्रकाश शेटे, बळीराम गवते, नागेश शिंदे, बप्पासाहेब घुगे, ह.भ.प. हरिदास महाराज जोगदंड, गिरी महाराज, नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, गणेश महाराज पांडे, ज्ञानेश्वर काशीद, पवन तात्या खवतड यांच्यासह गोरक्षनाथ टेकडीचा सर्व भक्त परिवार उपस्थित होता. काल्याच्या कीर्तनानिमित्त गोरक्षनाथ टेकडी परिसरात भाविकांची मोठी उपस्थिती होती. हरिनामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

### लोकनेते गोपीनाथराव मुंडे...

मिळणे आवश्यक होते. ही आवश्यकता लक्षात घेऊन स्वतंत्र ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे नटराज रंगमंदिरातील सांस्कृतिक कार्यक्रम तसेच वाचनालयातील दैनंदिन कामकाज आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सुविधांना याचा लाभ होणार आहे.नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण, शिक्षणव सांस्कृतिक सभापती योगेश मेनकुदळे, मुख्याधिकारी पी.एन. निगळ यांनी याबाबत सातत्यपूर्ण पाठपुरावा करुन ही कायमस्वरुपी सुविधा निर्माण केली आहे.

दरम्यान, शहराचा विकास केवळ रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर भौतिक सुविधांपुरता मर्यादित न ठेवता सांस्कृतिक, शैक्षणिक आणि बौद्धिक पायाभूत सुविधा सक्षम करण्यावरही भर दिला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून नटराज रंगमंदिर आणि डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयासाठी स्वतंत्र वीज व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांच्या गरजेनुसार आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम नगर परिषदेच्या माध्यमातून सुरू असल्याचे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले.

### शिक्षक पदभरती न झालेल्या...

त्याच्यापेक्षा कमी गुण असणाऱ्या उमेदवारांची जर निवड झालेली असेल,असे उमेदवारास आढळून आल्यास त्या उमेदवाराला आक्षेप नोंदविण्याची किंवा दुरुस्तीसाठी संधी शिक्षण आयुक्तालयांनी उपलब्ध केलेली असून, संबंधित उमेदवारांनी आपला आक्षेप दिलेल्या अर्जाच्या माध्यमातून पुराव्यानिशी नोंदवावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. अमर शेख यांनी केले आहे.
याबाबतीत सविस्तर माहिती अशी की,

शिक्षक पदभरती प्रक्रियेत निवड न झालेल्या उमेदवारांसाठी तक्रार निवारण समितीकडे अर्ज सादर करण्याचा नमुना प्रसिद्ध करण्यात आला आहे. अर्जामध्ये खालील माहिती नमूद करता येणार आहे.

### बुथ प्रमुखांनी चांगले...

नेते बाळराजे पवार, मराठवाडा संपर्क प्रमुख श्रीकांत सानप, ड. नागेश तांबारे यांनी ही मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना देशमुख म्हणाले की, एसआयआर च्या माध्यमातून आपल्या कार्यकर्त्यांवर भारतीय जनता पक्षाने महत्त्वाची जबाबदारी टाकलेली आहे. पक्षाच्या सर्व बुथ प्रमुखांनी, कार्यकर्त्यांनी चोखपणे जबाबदारी पार पाडत, मतदार ओळखपत्राच्या माध्यमातून चांगले काम केले आहे. मतदारांना ज्या काही अडचणी आल्या ,त्या सोडविण्यासाठी मेहनत घेतली, पक्षाच्या आदेशाचे पालन करून एक चांगला आदर्श पाडल्याबद्दल त्यांनी सर्व कार्यकर्त्यांचे यावेळी बोलताना कौतुक केले.सूत्रसंचालन पत्रकार सुशिल टकले यांनी केले. आभार युवा नेते सचिन दाभाडे यांनी मानले. कार्यक्रमास गेवराई मतदारसंघातील बुथ प्रमुख, नपचे सभापती, नगरसेवक, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### तीस दिवस पावसाचा खंड...

त्यामुळे उभ्या पिकांना पाणी देणेही अवघड झालेले आहे. सलग महिनाभर पावसाचा खंड असल्याने कोरडवाहू शेतातील तजेलदार उभी पिके आता माना टाकू लागले आहेत.

कारण निसर्गाच्या आणि पिक विमा कंपनी लहरीपणामुळे नुकसान टाळण्यासाठी पिक विमा घेण्यासाठी शेतकऱ्यांची उदासीनता दिवसेंदिवस वाढत आहे. निसर्गाने दगाफटका दिला तर किमान काही प्रमाणात का होईना नुकसान भरपाई मिळेल. अशी अशा शेतकऱ्यांना होती मात्र मागील अनुभव लक्षात घेता पिक विमा कंपनी देखील हातवारे करीत आहे.तरी काही प्रमाणात शेतकरी

या आपेक्षेपोटी पंतप्रधान पिक विमा उतरविला आहे. पण पिक विम्याच्या तरतुदी नुसार सलग पावसाचा खड, अतिवृष्टीत सलग पडलेला पाऊस असे निकष देण्यात आलेले आहेत. त्यानुसार खरीप हंगामात सलग २१ दिवस पावसाने खंड दिल्यास पिक विमा नुकसान भरपाई देण्याची तरतुद आहे. त्यानुसार जिल्ह्यातील मंडळ निहाय परिसरात सलग सुमारे तीस दिवस पावसाने खंडा दिल्यामुळे खरीपाची पिके माना टाकून करपताना दिसत आहेत. त्यामुळे पिक विमा कंपण्यांनी तसेच शासकीय यंत्रणेकडून या करपत असलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून आता होवू लागली आहे.

पत्रात शेवटी म्हटले की बीड जिल्ह्यातील शेतकरी चालू पिकावर भरमसाठ खर्च बहरलेली पिके करपत असल्याचे शेतकरी उघड्या डोळ्यांनी पहात असल्याने हवालदिल झाला आहे. करीता शेतकरी बळीराजा याला धीर देण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे यासाठी सर्व आमदार महोदय यांनी तातडीने राज्याचे मुख्यमंत्री यांची भेट घेऊन व जिल्ह्याचे पालकमंत्री यांना शेतकऱ्यांच्या बांधावर नेऊन प्रत्येक्षात पाहणी करून इतर जिल्ह्यांच्या प्रमाणात बीड जिल्ह्यातील शेतकरयांना आर्थिक मदत मिळुन द्यावी अशी मागणी समाजसेवक जे.डी.शाह यांनी केली आहे

### एलसीबीची आठ दिवसात...

आरोपीला ताब्यात घेतले. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांनी केली धडक कारवाई ही कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पीएसआय खटावकर,पो.हे.कॉ. यादव,पो.कॉन्स्टेबल परजणे, अशपाक आणि चालक वडमारे यांच्या पथकाने केली.

### राशन घेण्यावरुन वाद...

आरोपी महिलेने मुलाला चावा घेऊन जखमी केले आहे. याप्रकरणी लिंबराज निवृत्ती सोनहिवरे यांनी फिर्याद दिली असता त्यावरुन बर्दापूर पोलीस ठाण्यात आरोपी महादेव वामन फड, वामन ज्ञानोबा फड, शशीकला वामन फड सर्व रा. धसवाडी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार फड करीत आहेत.

# शहेनशहा वली दर्गा रस्त्यावरील पूल करा अन्यथा नगरपालिके समोर उपोषण : हाफेज इनामदार

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील ऐतिहासिक ठिकाण म्हणून ओळखले जाणारे हजर शहेनशहा वली दर्गा मार्गावरील पुलाचे काम येत्या २ सप्टेंबर पर्यंत सुरू करण्यात यावे अन्यथा नगरपालिका बीड कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा हाफेज इनामदार यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

दर्गा हजरत शहेंशाहवली कडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाची दुरावस्था झालेली असून तसेच हा शहरातील मुख्य रस्त्यापैकी एक रस्ता आहे. वर्दळीचा रस्ता आहे, सदरील रस्त्यावरुन शाळकरी मुले ये-जा करतात तसेच अंत्ययात्रा देखील याच रस्त्यावरुन जात आहेत. रस्ता हा अरुंद असल्यामुळे एका वेळी फक्त एकच वाहन या



रस्त्यावरुन जात आहे. पुलाच्या आजुबाजुला घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या सबंधी नगरपालिका कार्यालयात व जिल्हाधिकारी यांचेकडे वारंवार दुरावस्थे बाबत व रस्त्याचे आणि पुलाचे काम करण्या बाबत विनंत्या केलेल्या आहेत. जिल्हाधिकारी यांनी यापुर्वी सदरील काम करण्या बाबत आदेशीत केलेले असून देखील अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही. या रस्ता व पुलाचे काम होणे अत्यंत आवश्यक आहे, तरी देखील आपल्या कार्यालया मार्फत कसल्याही प्रकारची कार्यवाही

न झाल्यामुळे सदरील कामा बाबत उचित कार्यवाही करुन काम तात्काळ दुरु न केल्यास दिनांक ०२/०९/२०२६ वार बुधवार रोजी पासून नगरपालिका कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, यामुळे होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील असे निवेदनाद्वारे म्हटले आहे.

# पतसंस्थांचा कारभार अधिक पारदर्शक व सक्षम करण्यासाठी बीडमध्ये प्रशिक्षण कार्यशाळा

## सायबर सिक्युरिटी, आर्थिक मापदंड, कर्जवसुली व नियामक तरतुदींवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन





**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने नागरी, ग्रामीण व नोकरदार पतसंस्थांच्या अधिकारी, कर्मचारी व पदाधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दि. २० ऑगस्ट रोजी हॉटेल गोल्डन चॉईस, भगवान बाबा प्रतिष्ठानसमोर, सोमेश्वर मंदिराजवळ, बार्शी रोड, बीड येथे ही कार्यशाळा उत्साहात पार पडली.सहकार चळवळीला अधिक गतिमान करण्याबरोबरच पतसंस्थांचा कारभार पारदर्शक, कायदेशीर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, तसेच बदलत्या काळातील नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अधिकारी-कर्मचारी व पदाधिकाऱ्यांना आवश्यक ज्ञान मिळावे, या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील विविध नागरी, ग्रामीण व नोकरदार पतसंस्थांमधील अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने या प्रशिक्षणात सहभाग घेतला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड मा. श्री. सतीश तोटावार होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी मा. श्री. धनंजय डाईफोडे, सहनिबंधक (सेवानिवृत्त) तथा राज्य समन्वयक, एमसीडीसी, पुणे यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षणाची भूमिका व सहकार क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीवर प्रकाश टाकला. व्यासपीठावर तज्ज्ञ व्याख्याते मा. श्री. तानाजी कवडे, सहनिबंधक तथा लेखापरीक्षक (सेवानिवृत्त), पुणे; मा. श्री. सचिन घोडके, उपनिबंधक सहकारी संस्था, ता. बीड; श्री. आर. एम. मोटे, सहाय्यक निबंधक, शिरूर; श्री. सुनील जाधव, सहाय्यक निबंधक, पाटोदा; तसेच श्री. रामचंद्र ठोसर, सहकार अधिकारी श्रेणी-१, श्रीमती नमिता हिवराळे सहाय्यक सहकार अधिकारी व ओमकार अबुज यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यशाळेत पतसंस्थांच्या दैनंदिन कामकाजाशी संबंधित तसेच भविष्यातील आव्हानांचा विचार करून चार महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.'सायबर सिक्युरिटी, अँटी मनी लॉन्ड्रिंग तरतूद व - ख' या विषयावर मुंबई येथील तज्ज्ञ व्याख्याते श्री. वाल्मिक दराडे यांनी मार्गदर्शन केले.

# अकीदतीच्या वातावरणात हाजी हजरत हुरमन शाह रहमतुल्लाह अलैह यांचा संदल उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील तेलगाव रोड, सर्व्हे नं. ११५ येथील हाजी हजरत हुरमन शाह रहमतुल्लाह अलैह यांच्या दर्ग्याचा संदल आज मोठ्या अकीदतीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात काढण्यात आला. यावेळी परिसरातील अकीदतमंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संदलदरम्यान शहरात अमन-शांती, एकोपा आणि बंधुभाव कायम राहावा, यासाठी विशेष दुआ करण्यात आली. संपूर्ण परिसरात रूहानी वातावरण निर्माण झाले होते. इश्क-ए-रिसालतच्या भावनेने संपूर्ण माहोल भारावून गेला होता. या प्रसंगी दर्ग्याचे मुतवल्ली हमीद इनामदार, रऊफ इनामदार, सलीम इनामदार, कलीम इनामदार, आमेर इनामदार आणि वसीम इनामदार यांच्यासह अनेक अकीदतमंद, नागरिक व मान्यवर उपस्थित होते. अकीदत, प्रेम आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देत संदल उत्साहात पार पडला.

# अर्धा पावसाळा संपला तरी प्रकल्प अर्धेही भरले नाहीत!


**पात्रूड । प्रतिनिधी**

पावसाळा सुरु होऊन अर्ध्यापेक्षा जास्त दिवस झाले आहेत . मात्र आतापर्यंत जिल्ह्यातील प्रकल्प अजूनही अर्धे सुद्धा भरले नाहीत. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांचे सिंचन कसे करावे याची चिंता लागली आहे नागरिकांना पिण्याचे पाणी देखील टंचाई भासण्याची शक्यता वर्तवीली जात आहे. पावसाळा सुरू झाला तेव्हापासून जिल्ह्यात अद्याप पर्यंत एकही दमदार पाऊस झाला नाही त्यामुळे जिल्ह्यातील बरेच प्रकलण्यात मध्ये ५०% च्या पाणी आहे मोजके परकल्य १००% भरलेले आहेत जिल्ह्यात लघु सिंचन पाटबंधारे विभाग अंतर्गतबीड जिल्ह्यात शासकीय नोंदीनुसार १६ मध्यम सिंचन प्रकल्प आणि जवळपास १२२ ते १२६ लघु सिंचन प्रकल्प आहेत. याशिवाय जिल्ह्यात माजलगाव आणि मांजरा हे २ मोठे सिंचन प्रकल्प देखील आहेत. दोन्ही मध्यम प्रकल्प अजूनही ५० टक्के भरलेली नाहीत. त्यामुळे उर्वरित पावसाळ्यामध्ये जिल्ह्यातील सर्व प्रकल्प १०० टक्के भरली नाही तर रब्बी हंगामातील पिकेकशी घ्यावीत. असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. तसेच उन्हाळ्या अगोदरच जिल्ह्यात पिण्याचे पाणीची टंचाई भासत असते त्यातच अपुरा पाऊस झाल्यामुळे उन्हाळ्यात पिण्याचे पाणीची मोठी टंचाई उद् भावनार आहे . याकडे संबंधित विभागाने जातीने लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे संभावे पाणीटंचाई लक्षात घेता आत्तापासूनच प्रशासनाने योग्य ते उपयोजना करावे. अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# पावसाने ओढ दिल्याने सोयाबीन पिके मान टाकू लागली; शेतकरी आसमानी संकटात

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बनसारोळा शिवारात पावसाने मोठी ओढ दिल्याने सोयाबीन पिके सुकण्याच्या मार्गावर असून अनेक ठिकाणी पिकांनी अक्षरशः मान टाकण्यास सुरुवात केली आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांसमोर खरीप हंगामाचे संकट उभे राहिले असून शेतकरी चिंतेत सापडला आहे. सोयाबीन पिकाला सध्या पाण्याची नितांत गरज असताना पावसाने दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. त्यामुळे सोयाबीनची झाडे कोमेजत असून पिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. पावसाची प्रतीक्षा करत शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. पावसाअभावी नुकसान झालेल्या सोयाबीन पिकांचे तात्काळ पंचनामे करण्यात यावेत तसेच शेतकऱ्यांना पीकविमा व शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. दरम्यान, पावसाने ओढ दिलेल्या भागात शासनाने आवश्यक त्या कृत्रिम पावसासह इतर उपाययोजना राबवाव्यात अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे. प्रशासनाने तातडीने बनसारोळा शिवाराची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# मिल्लीया महाविद्यालयात जलसंधारण दिन साजरा



**बीड । प्रतिनिधी**

येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गृहविज्ञान विभाग व डी.एस.डब्ल्यू. विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ ऑगस्ट २०२६ शुक्रवार रोजी जलसंधारण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणूक, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध जलस्रोतांचा योग्य व शाश्वत वापर याबाबत जनजागृती करण्यासाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून जलसंधारणाचा संदेश देणाऱ्या आकर्षक व संदेशपर रांगोळ्या साकारल्या. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जलसंधारणाची शपथ देण्यात आली. पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाण्याची नासाडी टाळणे व समाजामध्ये जलसंधारणाबाबत जनजागृती करणे यासाठी सर्वांनी संकल्प केला. या वेळी उपप्राचार्य प्रोफेसर हुसेनी एस.एस, विधार्थी कल्याण मंडळचे अध्यक्ष डॉ.शेख हुसैन, प्रोफेसर अब्दुल अनिस, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर रमेशराव वारे, प्रा. शोएब पिरजादे , डॉ. शामल जाधव, डॉ. सुवर्णा तालखेडकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# प्रेरणेच्या प्रवासातील सर्वोत्तम मानबिंदू - जलील शेख सर

चालू काही वर्षात शिक्षण क्षेत्रात खूप सगळी स्थितंतरे घडताना दिसत आहेत . कुठे विद्यार्थ्यांचा पट कमी होतो आहे तर कुठे शिक्षकांची संख्या घटत आहे . अशा दोलायमान परिस्थितीमध्ये विद्यार्थी .. पालक .. आणि शिक्षक हे सगळेच अडचणीत येत आहेत . ..! वयाच्या एका विशिष्ट टप्प्यावर पोचल्यावर शिक्षकांचा सेवेतला अनुभव वाढतो पण शरीराची साथ मिळत नाही म्हणून पन्नाशी नंतर ते शिथील होतात . .. आणि ही नैसर्गिक प्रक्रिया आहे . पन्नाशी पार केलेल्या शिक्षकांची सेवा किमान ३० वर्ष तरी झालेली असते . शिक्षण प्रक्रियेतील नवीन संकल्पना , नवीन संबोध आणि नवीन धोरणात्मक बदल झटपट स्विकारण्याची त्यांच्यामध्ये धमक तितकी नसते जेवढी दहावर्ष पूर्ण झालेल्या शिक्षकांकडे असते . आमचीही काहीशी तशीच आवस्था होत चालली होती . जीवाला जीव देऊन शाळेच्या विकसा साठी झटणारे सगळे सहकारी बदली होऊन दुसऱ्या शाळेत गेले होते . नवीन येणारे शिक्षक कसे असतील या संभ्रमात गाव , शाळा , विद्यार्थी आणि शिक्षक होते ... ! अचानक शाळेच्या प्रांगणात आदरणिय जलील शेख सर यांनी प्रवेश केला . आणि आमच्या शाळेचे नशीब बदलल .... पहिल्याच दिवशी सरांनी वर्गात पाऊल टाकले आणि ते त्याक्षणी विद्यार्थ्यांचे होऊन बसले . कामाचा ऊरक आणि व्यासंग इतका प्रचंड जाणवला की एखादा नव्याने रूजू झालेला शिक्षक आपल्याकडे बदली होऊन आले अस वाटल . ..! मितभाषी स्वभाव .. शांत सागरासारख अथांग मन आणि सातत्याने नवीन निर्मितीची शोधक नजर ... हे त्यांच्या स्वभावाचे स्थायी भाव . . ! नव्या संकल्पनांचा महामेरू आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची खाणच जणू ते केंद्रप्रमुखांचा चार्ज घेताना कासाविस होऊन अनेक वेळा नम्र भावाने नकार दिला पण शेवटी अधिकारी पण पारखी असतात . . ! त्यांना तो मूळ कार्य सांभाळून केंद्रप्रमुख चार्ज घेण्याचा आदेश प्राप्त झाला ... शेख सरांनी शाळा भेटीच्या नावाखाली एक मिनीट ही कधी स्व कर्तव्यातला वाया घातला नाही . मधल्या इंटरवेल मध्ये अचानक ते निघून जायचे आणि दीर्घ मध्यंतर संपण्यापूर्वी शाळेत हजर व्हायचे ... चेहऱ्यावर थकवा जाणवायचा पण कधी बोलून दाखवायचे नाही . . कधीतरी एकांतात आमच्या कानात सांगायचे ... दादा , ही शाळा आपली कर्मभूमी आहे . इथले विद्यार्थी हे आपल दैवत आहे . त्यांना घडविण्या साठी आपली मूळ नेमणूक आहे . ते प्रथम कार्य . .. बाकी सगळ दुय्यम ! एका महिन्यात १५ हजार इंग्रजी शब्द विद्यार्थ्यांकडून वही मध्ये लिहून घ्यावेत .. फक्त शेख सरांनी . .. त्यांना



शब्बासकी म्हणून हजारो रुपयांचे रोख बक्षीस द्यावे .. तेही शेख सरांनी .. नवीन उपक्रमांना वेळ देत सराव करताना इतर विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये म्हणून दार बंद करून तासंतास सराव घ्यावा तो ही शेख सरांनीच ... आणि जेव्हा त्या कार्यक्रमाचे प्रदर्शन होईल तेव्हा त्या यशाचे मानकरी माझे शिक्षक बांधव आहेत ... हा मनाचा उच्च कोटीचा मोठेपणा दाखववा तो ही शेख सरांनीच . इस्त्रो च्या परिक्षेची तयारी असेल . .. स्कॉलरशिप परीक्षा तयारी असेल .. शाळेत जादा तास असतील किंवा रविवारची शाळा असेल तिथ कायम जबाबदारी खांद्यावर घ्यावी ती फक्त शेख सरांनी ..! शाळेचे अंतर्बाह्य रूप बदलवताना कुटूंबाकडे , व्यवसायाकडे आणि स्वतः च्या प्रकृती कडे दूर्लक्ष होत आहे . याची जाणीव होऊनही न थांबता न थकता आणि या प्रचंड व्यापाचा कसलाही उहापोह न करता सतत कार्यरत राहणारा असा शिक्षक आम्ही ३२ वर्षाच्या सेवेत प्रथमच पाहिला ... ! शालेय क्रिडास्पर्धा असो किंवा शालेय सहल जीव ओतून काम करणारे आणि सहकाऱ्यांकडून हसत मुखाने आनंदाने काम करून घेण्याची हातोटी ही आजवर आम्ही नाही पाहिली ... ! जिल्हा क्रिडा स्पर्धांमध्ये शाळेच्या संघाने प्राप्त केलेल्या अद्वितिय यशाच पाया जर कुठे घातला गेला असेल तर तो शेख सरांच्या शिस्तप्रिय कर्तव्य भावनेत ... ! आज सरांनी स्वखर्चाने मुलींसाठी स्वतंत्र बाथरूम बांधून घेण्याचा निर्णय घेतला ... काम ही सुरु केले . पण तरीही कुठेही वाच्यता नाही .. आमच्या बदलीमुळे आमचे हात या पवित्र कार्याला नाही लागू शकले .. ही खूप मोठी खंत आमच्या मनात राहील . प्रदीर्ध सेवेच्या या कालखंडात अनेक जेष्ठ शिक्षक मुख्याध्यापक भेटले . अनेकांकडून खूप शिकायला भेटल .. अनेकांनी आम्हाला मायेची ऊब आणि मुक्त कंठाने शुभेच्छा आशिर्वाद दिले ... पण आदरणिय शेख सरांनी विझत चाललेला एक दिवा पुन्हा आपल्या सहवासाने प्रज्वालित करून पाठवला ...! सर आपल्या पायावर नतमस्तक होऊन आम्ही आपला निरोप घेतला आहे .. जिथ जाऊ ... तिथे आपला आदर्श आमच्या सोबत असेल ..! आपण आज केंद्राचे मुख्याध्यापक आहात . . तरीही आपला जीव आपल्या शाळेच्या उंबऱ्या बाहेर निघत नाही ..! आपल्या लेकींच्या आत्यावश्यक सेवेसाठी उभारत असलेल्या कार्याला आमच्या मनोमन शुभेच्छा..!

**भास्कर ढवळे**
**उच्च प्रा . शाळा कळसंबर**

# आदित्य महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा भव्य रॅली अन् वृक्षारोपण

## महाविद्यालयात ४३१ झाडांची लागवड; विद्यार्थ्यांकडून वृक्ष संगोपनाचा संकल्प



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) संयुक्त विद्यमाने आदित्य कृषी महाविद्यालय, बीड येथे 'स्वच्छता पंधरवडा' अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. अभियानांतर्गत परिसर स्वच्छता मोहीम, भव्य जनजागृती रॅली आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचा उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आला. यावेळी महाविद्यालय परिसरात तब्बल ४३१ वृक्ष लागवड करण्यात आली. लावलेले वृक्ष विद्यार्थ्यांकडून संगोपनाचा संकल्प करण्यात आला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र येत परिसर तसेच परिसरातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता केली. यानंतर विद्यार्थ्यांनी हातात स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिक मुक्ती आणि जलसंरक्षणाचे संदेश देणारे फलक घेऊन भव्य जनजागृती रॅली काढली. या रॅलीद्वारे नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. या मोहिमेचा मुख्य भाग म्हणून महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. परिसर हिरवागार करण्याच्या उद्देशाने अभियानादरम्यान एकूण ४३१ झाडांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी केवळ झाडे लावली नाहीत, तर त्यांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याची शपथही घेतली. हा उपक्रम आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. श्याम भुतडा यांच्या उत्तम नियोजनामुळे संपूर्ण पंधरवड्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

# मारामारी प्रकरणात अशोक हावळे व स्वाती हावळे यांना अटकपूर्व जामीन

**बीड । प्रतिनिधी**

पोत्रा येथे दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या मारामारीच्या घटनेप्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली होती. फिर्यादीनुसार, घरातील वादातून शिवीगाळ व मारामारी झाल्याचे तसेच या घटनेत फिर्यादी व तिच्या पतीला दुखापत झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर उपचारासाठी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात अशोक रामचंद्र हावळे व स्वाती हावळे यांच्या वतीने अटकपूर्व जामिनासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला. आरोपींच्या वतीने ॲड. यशवंत नवनाथ मुंढे यांनी मा. न्यायालयासमोर प्रभावीपणे बाजू मांडत प्रकरणातील वस्तुस्थिती व उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे कायदेशीर युक्तिवाद केला. मा. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून अशोक रामचंद्र हावळे व स्वाती हावळे यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला. सदर प्रकरणात ॲड. यशवंत नवनाथ मुंढे यांनी काम पाहिले असून ॲड. दीपक कुलकर्णी यांनी सहकार्य केले.



# पाऊस नसलेल्या भागांमध्ये सरकारने दुष्काळ जाहीर करावा : प्रा.आंधळे

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २३ ८ २०२६ सध्या सगळीकडे असलेल्या कडक उन्हामुळे आणि कोरडे हवामान असल्यामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे आणि काही ठिकाणी तर जमिनीला भेगा देखील पडल्या आहेत सोयाबीनची पाने सुकू लागली आहेत पिकांची वाढ खुंटत आहे पाऊस आणखी काही दिवस लांबल्यास उत्पादनात मोठी घट निर्माण होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत शेतकऱ्यांनी बियाणे खते औषधे आणि मशागतीसाठी मोठा खर्च केलेला आहे अनेकांनी उसनवारी करून किंवा कर्ज काढून पेरणी केलेली आहे सुरुवातीला पीक चांगले आल्याने यंदा उत्पन्न चांगले मिळेल अशी आशा निर्माण झालेली होती मात्र आता पाण्याअभावी पिके सुकू लागली आहेत ऐनवाढीच्या टप्प्यातआणि शेंगा भरण्याच्या वेळेस पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे.



शेतकऱ्याच्या चिंचेत वाढ झाली आहे कष्ट करून उभे केलेले पीक आता वाळताना पाहावे लागत आहे शासनाने तातडीने आमच्या शेताची पाहणी करून मदत करावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्याकडून होत आहे थेट बांधावर जाऊन पंचनामे करण्याची मागणी नुकसान झालेल्या पिकाचे महसूल आणि कृषी विभागाने तातडीने प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामे करावेत अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे पंचनामे करताना प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून पारदर्शक पद्धतीने नुकसान नोंदवावे आणि पात्र शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आहे. पावसाने आणखी ओढ दिल्यास सोयाबीन सह इतर खरीप पिकावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे त्यामुळे शासन आणि प्रशासनाने वेळ न दवडता परिस्थितीची पाहणी करून बळीराजाला तातडीचा दिलासा द्यावा अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



**जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा पोहनेर तालुका परळी येथे स्वातंत्र्य दिवस निमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धांमध्ये अन्सारी शिफा जब्बार प्रथम तर माहेरा सत्तार कुरेशी यांनी दुसरा क्रमांक पटकावले आहे या विद्यार्थ्यांनां देशमुख साहेब (निवृत्ती उपमुख्य कार्यकारी अधिकारी), व गोपाळ संस्थाचे अध्यक्ष तसेच गावाचे सरपंच यांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करून कौतुक करण्यात आले.**

CMYK

दै.बीड सुपरफास्ट
www.beedsuperfast.com
Happy Morning
सोमवार दि. ३१ ऑगस्ट, २०२६ पान- ४

# वडवणी शहराचे लौकिक सलोख्याने जपू : आ.सोळंके

## शांतता अन् सौहार्द कायम ठेवण्यासाठी शांतता कमिटीची बैठक

**वडवणी । प्रतिनिधी**

शहरात किरकोळ कारणावरून घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर येथे शांतता व सौहार्द कायम ठेवण्यासाठी आ. प्रकाश सोळंके यांनी पुढाकार घेत तहसील कार्यालयात शांतता कमिटीची बैठक घेतली. यावेळी त्यांनी वडवणी शहराचे लोकिक सलोख्याने जपू असे प्रतिपादन केले. तसेच सर्वांनी शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन केले. काही दिवसांपूर्वी वडवणी शहरात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरातील शांतता व सामाजिक सलोखा पुन्हा दृढ व्हावा, यासाठी शांतता समितीची बैठक घेण्यात आली. घडलेली घटना ही वाहन पार्किंगच्या किरकोळ कारणातून घडली, मात्र त्याचे स्वरूप धार्मिक वादाच्या दिशेने गेले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. भविष्यात अशा किरकोळ घटनांना वेगळे स्वरूप प्राप्त होऊ नये, यासाठी प्रत्येक समाजातील अशा प्रवृत्तींना

वेळीच आळा घालणे आवश्यक आहे. यावेळी पुढे बोलताना आ. प्रकाश सोळंके म्हणाले की, घडलेल्या घटनेची कायद्यानुसार चौकशी होऊन दोषींवर योग्य ती कठोर कारवाई झालीच पाहिजे, ही आमची स्पष्ट भूमिका आहे. पोलिसांनी तपासाची पूर्तता करून दोषींवर कायद्यानुसार कठोरातील कठोर कारवाई करावी, अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या. मात्र, या कारवाईसोबतच शहरातील सामाजिक सलोखा आणि शांततेला कोणत्याही परिस्थितीत तडा जाऊ नये, हीदेखील अपेक्षा व्यक्त केली. वडवणी शहरातील नागरिक आजवर गुण्यागोविंदाने आणि परस्पर सामंजस्याने राहत आले आहेत. हा सामाजिक सलोखा हीच वडवणीची खरी ओळख आणि लौकिक आहे. शहरातील वाद शहरातील नागरिकांनी परस्पर संवाद, संयम आणि सामंजस्यातून सोडविले तर कोणत्याही बाहेरील व्यक्तीला परिस्थितीचा गैरफायदा घेऊन वाद चिघळविण्याची संधी मिळणार नाही असे सांगितले आहे. यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व जाती धर्माचे नागरिक उपस्थित होते.




# गोरक्षनाथ टेकडी येथे काल्याच्या कीर्तनाला जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थिती

## संतविचार आचरणात आणण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळयानिमित्त ह.भ.प.संजय महाराज पाचपोर यांच्या काल्याच्या कीर्तनाला माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबा महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

यावेळी बोलताना जयदत्त क्षीरसागर यांनी वारकरी संप्रदायाची परंपरा ही समाजाला जोडणारी आणि माणुसकीचा संदेश देणारी आहे, असे सांगितले. संत-महंतांनी आपल्या आचरणातून समाजाला भक्ती, संस्कार, समता आणि बंधुभावाचा मार्ग दाखवला असून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. नामस्मरणाबरोबरच संतांचे विचार आपल्या जीवनात आचरणात आणणे महत्त्वाचे आहे. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजात एकोपा आणि बंधुभाव निर्माण होतो. संतांच्या विचारांनी समाजाला योग्य दिशा मिळते, त्यामुळे ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असेही क्षीरसागर यांनी सांगितले. गोरक्षनाथ टेकडीसारख्या पवित्र धार्मिक स्थळी होणारे अखंड हरिनाम सप्ताह आणि कीर्तन सोहळे ही समाजासाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारी केंद्रे आहेत. हरिनाम, संतविचार आणि समाजसेवा यांचा संगम घडवून आणणे हीच या परंपरेची खरी ताकद आहे, असे क्षीरसागर यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले. यावेळी मनोज जरांगे पाटील, खा.बजरंग सोनवणे, आ.विजयसिंह पंडित, » पान २ वर

# धागा विश्वासाचा : स्व.महादेव मुंडेंच्या पत्नीने खा.बजरंग सोनवणेंना बांधली राखी

## न्यायासाठी पाठीशी राहण्याची खा.सोनवणेंची ग्वाही

**बीड । प्रतिनिधी**

एकीकडे अखंड हरिनामाचा गजर, टाळ-मृदुंगाचा नाद आणि संत-महंतांची मांदियाळी... तर दुसरीकडे नियतीने हिरावून घेतलेल्या छत्रछायेची भळभळणारी जखम!, या भक्तिमय अन् भावूक वातावरणात जेव्हा एका उध्वस्त झालेल्या कुटुंबातील भगिनीने खा.बजरंग सोनवणे यांच्या मनगटावर विश्वासाचा राखीचा धागा बांधला, तेव्हा उपस्थितांचे डोळे पाणावले. यावेळी 'माझ्या या बहिणीच्या न्यायासाठी मी खंबीरपणे पाठीशी उभा राहीन', अशी ग्वाही खा.सोनवणे यांनी दिली.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान (ता.जि.बीड) येथे वख्यिात संत ह.भ.प.वै.सद्‌गुरू किसनबाबा महाराज यांच्या पुण्यतिथीनिमत्ति आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा सांगता समारंभ अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्यास खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित राहून संत-महंतांचे आशीर्वाद घेतले. मात्र, या सोहळ्यात घडलेल्या एका अत्यंत भावनिक प्रसंगाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. परळी येथील स्व.महादेव मुंडे यांच्या दु:खाच्या सावटाखाली जगणाऱ्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी गोरक्षनाथ टेकडी येथे खा.बजरंग सोनवणे यांची भेट घेत आपुलकीने राखी बांधली. जेव्हा हातातील राखी खा.सोनवणेंच्या मनगटावर बांधली गेली तेव्हा न्यायाची आशा असणाऱ्या या बहिणीच्या डोळ्यांतून अश्रू तरळले. भावाच्या मायेने आणि संवेदनशीलतेने खा.सोनवणे यांनीही तिचे सांत्वन केले. या भावूक क्षणी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, हा केवळ एक धागा नाही, तर एका पीडित बहिणीने माझ्यावर दाखवलेला अढळ विश्वास आहे. स्व.महादेव मुंडे यांच्या कुटुंबावर झालेला अन्याय मी जवळून पाहिला आहे. माझ्या या बहिणीला न्याय मिळवून देण्यासाठी मी सनदशीर मार्गाने आणि वैयक्तिक पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न करेन. तच्यिा पाठीशी तिचा भाऊ म्हणून मी उभा आहे. सप्ताहाच्या सांगता प्रसंगी भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या वातावरणात घडलेल्या या भावनिक सोहळ्याने उपस्थितांची मनं जिंकली. जातीपातीपलीकडे जाऊन जपलेले हे बहिन भावाचे नाते बीड जल्हिाच्या राजकीय अन् सामाजिक वर्तुळात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरले आहे.



# बुथ प्रमुखांनी चांगले काम केले, उद्याचा आमदार भारतीय जनता पक्षाचा -जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या बुथ प्रमुखांनी , कार्यकर्त्यांनी मतदान याद्यांचे सकोल पुनर्निरीक्षण एसआयआर च्या माध्यमातून उत्कृष्ट काम केले असून, याच जोरावर उद्याच्या निवडणुकीत निश्चितच आपल्या पक्षाचा आमदार निवडून येणार आहे. असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी येथे केले आहे.**

## गेवराई शहरात पार पडले एसआयआर प्रशिक्षण



शुक्रवार ता. २८ रोजी सकाळी अकरा वाजता गेवराई येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने गजानन लॉन्स सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या एसआयआर प्रशिक्षण कार्यशाळेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा नेते बाळराजे पवार, मदाठवाडा संपर्क प्रमुख श्रीकांत सानप, रोहित पंडित, ड. रासकर, दत्ता जाधव, शिवराज पवार, यशराज पंडित, सचिन दाभाडे, प्रा.पीटी चव्हाण, नपचे उपाध्यक्ष ॲड. जिजा घुंबार्डे, नपचे गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, भरत गायकवाड, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, नगरसेवक जिजा खंडागळे, सुंदर चव्हाण, प्रा. येळापुरे, रूपाली ताई कचरे,मनोज पाटील, शांतीलाल डोरले, माजी सभापती भरत गायकवाड, नागेश तांबारे, प्रशांत रुईकर यांची उपस्थिती होती. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा » पान २ वर

# शिक्षक पदभरती न झालेल्या पात्र व न्यायिक उमेदवारांनी शिक्षण आयुक्तांकडे आक्षेप नोंदवावे-प्रा.अमर शेख

**बीड । प्रतिनिधी**



पहिल्या टप्प्यात पवित्र पोर्टल च्या माध्यमातून भावी शिक्षकांची निवड यादी शिक्षण आयुक्तालयांकडून नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली असून त्यामध्ये जवळपास एकूण १९७५४ रिक्त पदांपैकी १३११९ उमेदवारांची जिल्हा परिषद,नगरपालिका,महानगरपालिका, आदिवासी विकास, शासकीय विद्यानिकेतन आणि काही खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेत सदरील गुणवत्ता निहाय यादीत नावे असलेल्या उमेदवारांची पदभरती यादी शासनाच्या शिक्षण आयुक्तालयाने पवित्र पोर्टलवर घोषित केलेली आहे. परंतु काही पात्र उमेदवारांना कट ऑफ पेक्षा जास्त गुण असून सुद्धा निवड झालेली नसेल आणि » पान २ वर

# मैदानावरची जिद्द जीवनात यश मिळवून देते-प्रा. गणेश पवळ

## जयभवानी विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात; हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांना अभिवादन

**गढी । प्रतिनिधी**

जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिवाजीनगर गढी येथे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीचा विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची, हॉकी क्षेत्रातील अतुलनीय योगदानाची तसेच त्यांच्या असामान्य क्रीडा कौशल्याची माहिती देण्यात आली. आपल्या उत्कृष्ट हॉकी खेळाच्या माध्यमातून मेजर ध्यानचंद यांनी भारताचे नाव जगभरात उज्वल केले. त्यांच्या विलक्षण खेळकौशल्यामुळे त्यांना 'हॉकीचे जादूगार' म्हणून ओळखले जाते.

यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्याध्यापक प्रा.गणेश पवळ यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडेलाही आपल्या जीवनाचा महत्त्वाचा भाग बनवावे, असे आवाहन केले. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संघभावना आणि जिद्द निर्माण होते. मैदानावर संघर्ष करण्याची सवय लागली की जीवनातील अडचणींवरही मात करण्याचे बळ मिळते, असे प्रतिपादन त्यांनी केले. मेजर ध्यानचंद यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी शिस्त, मेहनत, जिद्द आणि देशप्रेमाची प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी ओम मोटे सर व दिलीप धस यांनीही मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा कारकिर्दीचा



आणि देशासाठी त्यांनी केलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा कल्याण जायगुडे, पर्यवेक्षक रणजीत बडे, प्रा. बारगजे, प्रा. भोसले, प्रा. तौर, राजगुडे सर, काळे सर, डोंगरे सर, किशोर सोनवणे आपशिंगेकर सर, श्रीमती वराट मॅडम, प्रा. राणी जगदाळे मॅडम, सुदेवाड मॅडम, करिष्मा मॅडम, पांढरे सर, दीपक शिंदे सर, दादा तळेकर, सी. आर. पवार सर, भागवत पवार, आडे सर, श्रीराम शिंदे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सोलर प्लांटमध्ये चोरी आणि तोडफोड सुमारे पावणेआठ लाखांचे नुकसान

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भाटवडगाव शिवारात असलेल्या सोलर पॉवर प्लांटमध्ये अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री घुसखोरी करून लाखो रुपयांच्या केबल्स चोरून नेल्याची आणि मोठ्या प्रमाणावर साहित्याची तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत सोलर प्लांटचे सुमारे ७ लाख ६४ हजार रुपयांचे नुकसान झाले असून माजलगाव ग्रामीण पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परभणी येथील व्यावसायिक सतीश माणिकराव बेंबळकर यांच्या मालकीच्या 'बेंबळकर ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड' या सोलर प्लांटमध्ये २५ जुलै रोजी रात्री पावणेबारा वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी कंपाऊंडच्या तारेवरून आत प्रवेश केला. चोरट्यांनी इन्व्हर्टरला जोडलेली सुमारे ७५ हजार रुपये किमतीची १२७३ मीटर डीसी वायर कापून चोरून नेली. याशिवाय प्लांटमधील डीसी केबल, अर्थिंग केबल, कॉपर लग्झ, एमसी फोर कनेक्टर, ट्रान्सफर मार्शलिंग बॉक्स आणि इन्व्हर्टर सेफ्टी बॉक्स या साहित्याची तोडफोड करून सुमारे ६ लाख ८९ हजार रुपयांचे अतोनात नुकसान केले.



बीड : सलीम भाई जहांगीर यांची भाजपा अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल सलीम भाई जहागीर यांचा शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन ए.एस. (गोलू) व शेख वसीम यांनी सत्कार केला

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर व डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयासाठी स्वतंत्र वीज व्यवस्था !

## ६३ के.व्ही.ए. क्षमतेचा बसवला स्वतंत्र नवीन ट्रान्सफॉर्मर

**परळी । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ नगर परिषदेच्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर आणि डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालय या शहरातील महत्त्वाच्या सांस्कृतिक व शैक्षणिक वास्तूंसाठी स्वतंत्र विद्युत व्यवस्थेची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या माध्यमातून ६३ के.व्ही.ए. क्षमतेचा नवीन स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात विविध सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक आणि कला क्षेत्रातील कार्यक्रम, नाट्यप्रयोग तसेच व्याख्याने आयोजित केली जातात. तर डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी, वाचक आणि नागरिकांना अभ्यास व वाचनासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाते. या दोन्ही वास्तूंना कार्यक्रमांच्या वेळी तसेच दैनंदिन वापरासाठी सुरळीत आणि स्थिर वीजपुरवठा » पान २ वर



दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स ॲण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादकः अतुल शंकरराव जाधव

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV

CMYK